# चैतन्य साधना



डॉ. मनीषा शेटे

## कल्याणमित्र


शुभेच्छा, सद्भावना, आशीर्वाद, शुभाकांक्षी या अतिशय अर्थपूर्ण पण विविध प्रकारे प्रकट होणाऱ्या शब्दांना जोडणारा शब्द म्हणजे 'सुहृद, स्नेही, नातलग, ज्येष्ठ, मित्र' या सगळ्यांबरोबर हल्ली एक शब्द आवर्जून वापरला जातो तो म्हणजे 'कल्याणमित्र'! कोण हा कल्याणमित्र ? तो खरेतर बहुतांशी वेळेला तुमचा नातेवाईक नसतो, त्यामुळे घरातील असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्याची तुमची मैत्री कशी असेल ते सांगता येत नाही, बहुधा तुमचा त्याच्याशी परिचय असेल पण मैत्री असेलच असे नाही. कल्याणमित्राशी तुमचा दीर्घकाळ परिचय असेल किंवा तो अगदी थोड्या काळासाठी तुमच्या सहवासात आला असेल पण, जितका वेळ तो तुमच्या सहवासात असेल तेवढ्याच वेळात तो कदाचित अशा प्रकारे तुम्हाला प्रभावित करेल की आयुष्यात तुम्हाला कदाचित कधीच मागे वळून पाहावे लागणार नाही. तो तुमचे चुकले तर सांगेल पण ते सांगताना कोणताही अभिनिवेश नसेल. त्याच्याशी बोलताना तुम्हाला कोणतेही दडपण नसेल. विचारांची मुक्त देवाणघेवाण या नात्यात शक्य होते. वयाचा अडसर नसतो. शिक्षण, आर्थिक स्तर या सगळ्याचा प्रश्नच येत नाही या नात्यात.

असं अद्भुत नाते फार थोड्या जणांना लाभते. जगात काही माणसे अशी कल्याणमित्र असतात. त्यांना कोणी सांगत नाही की त्यांनी कल्याणमित्र व्हायचे आहे. उपजतच काही व्यक्तींना असे वाटते की, आपल्या सहवासात आलेल्या सगळ्यांचे चांगले झाले पाहिजे. त्याच्यात त्यांच्या कोणत्याही अपेक्षा नसतात. आर्थिक तर मुळीच नाही आणि मानसन्मानाचेही वावडे असते त्यांना. सगळ्यांच्या पुढे असायला हवे अशी आवड नसते. उलट एखाद्याच्या यशासाठी पडद्यामागे राहून काम करायलाच त्यांना आवडते. अनेक यशस्वी व्यक्ती आपल्या यशामागचे गुपित उलगडतात तेव्हा सांगतात की, विशिष्ट प्रसंगात त्यांना 'क्ष' नावाच्या व्यक्तीने धीर दिला आणि पाठीवर हात ठेवला. त्यामुळे त्यांना कधीच मागे वळून पाहावे लागले नाही. ही 'क्ष' नावाची माणसे म्हणजे कल्याणमित्र!

आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात खरंच असे कल्याणमित्र असतात ते आयुष्यात अनपेक्षितपणे बसणाऱ्या टक्क्याटोणप्यांमधून बाहेर पडायला आपल्याला मदत करतात. जगाविषयीचे आपले अनुभव कितीही कटू असले तरी एक तरी अनुभव असा असतो, कदाचित एकापेक्षा जास्तही ... आपण या चांगल्या अनुभवांशी प्रामाणिक राहायला हवे. आपल्या आजूबाजूच्या व्यक्तींचा छोट्या-छोट्या गोष्टीसाठी राग राग करणे, त्यांना कमी लेखणे, त्यांच्यातील उणीवांचे जाहीर प्रदर्शन करणे. ज्यामुळे एखाद्या व्यक्तीचा आत्मविश्वास कमी होईल असे बोलणे हे जास्तीत जास्त टाळायचा प्रयत्न केला पाहिजे. आपण तर असे वागू नयेच पण जिथे जिथे शक्य होईल तिथे दुसऱ्यांनीही असे करू नये यासाठी आपल्याला जाहीर भूमिका घेता आली पाहिजे.

कल्याणमित्र होता येणे वाटते तेव्हढे अवघड नक्कीच नाहीय, त्यासाठी तुम्हाला खरंतर काहीच लागत नाही! लागतात फक्त सद्भावना, दुसऱ्याचे दुःख, त्रास समजून घेण्याची क्षमता आणि सहज पुढे करता येणारा मदतीचा हात.

(क्रमशः)



मध्यरात्रीपासून बेस्ट कर्मचारी संपावर गेल्याने मंगळवारी मुंबईकरांचे प्रचंड हाल झाले. प्रवासासाठी खाजगी बसचा पर्याय काहींनी स्वीकारला. तर एखादी रिक्षा मिळणेही प्रवाशांना कठीण बनले होते. बाहेरगावाहून आलेल्या लोकांना आपल्याकडील अवजड सामान सांभाळत काही वाहन मिळते का हे पाहण्यासाठी बरीच मेहनत घ्यावी लागली. (छाया : बी.एल. सोनी)

# मतदारसंघातील योजनांसाठी आमदारांना स्वतंत्र निधी देण्यात येणार

विशेष प्रतिनिधी

मुंबई, मंगळवार - आमदारांच्या मतदारसंघातील वैयक्तिक लाभांच्या योजनेसाठी स्वतंत्र निधी देण्यात येणार असून यासाठी योजनेला कात्री लागू शकते, असे सूचक उद्गार अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी पत्रकारांशी बोलताना काढले. निवडणूक डोळ्यासमोर ठेवून शासनाने हा निर्णय घेतल्याची चर्चा केली जात आहे.

मागील वर्षाच्या अर्थसंकल्पातील काही रक्कम खर्च न झाल्याने शिल्लक राहणार आहे. याचबरोबर ७ व्या वेतन आयोगासाठी मागील अर्थसंकल्पात १० हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी येत्या तीन महिन्यात ४ हजार कोटी खर्च होणार आहेत. उर्वरित ६ हजार कोटी २५/१५ च्या योजनेसाठी खर्च करता येऊ शकतात. तसेच कर्जमाफीसाठी तरतूद केली आहे त्यापैकी ६ ते साडेसहा हजार कोटी शिल्लक आहेत. तर याचबरोबर गेल्यावर्षीच्या बजेटमध्ये अडीच हजार कोटी शिल्लक आहेत. हे सगळे असले तरी कुठल्या विभागाला हा निधी द्यायचा याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे घेतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**भाजप-सेना आमदारांना चारशे कोटींचे वाटप!**

राज्यातील सेना-भाजप आमदारांना प्रत्येकी पाच कोटी रुपयाप्रमाणे एकूण चारशे कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. अर्थसंकल्पात यासाठी ८०० कोटींची तरतूद करून ठेवली आहे. सेना-भाजप आमदारांच्या मतदारसंघात हा निधी खर्च करण्यासाठी गेलाही आहे, असे मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले.

# बोरिवली व सांताक्रूझ येथे क्रिकेट सामन्यांवर बेटींग

## मुख्य बुकीसह चौघांना अटक व कोठडी

मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी) - बोरिवली व सांताक्रूझ येथे क्रिकेट सामन्यावर बेटींग घेणाऱ्या मुख्य बुकीसह चौघांना काल दोन कारवाईत सांताक्रूझ पोलिसांनी अटक केली. या चौघांनाही वांद्रे येथील स्थानिक महानगर दंडाधिकारी न्यायालयात हजर करण्यात आले होते, यावेळी त्यांना ११ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

बिपीन वेलजी शाह ऊर्फ बिपीन इंद्रपस्थ, जितेंद्र सुरेश जाधव, नारायणलाल भगाराम रेबारी आणि देवीलाल भोगालाल जाट अशी या चौघांची नावे असल्याचे पोलिसांनी सांगितले. ऑस्ट्रेलिया येथे बिग बॅश सिरीज सुरू असून या सिरीजच्या टी/२० सामन्यावर बोरिवली आणि सांताक्रूझ परिसरातून मोबाईलवरुन बेटींग सुरू असल्याची माहिती सांताक्रूझ पोलिसांना मिळाली. या माहितीची शहानिशा करण्यासाठी सहाय्यक पोलीस आयुक्त दत्तात्रय भरगुडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम कोरेगावकर यांच्या पथकाने बोरिवलीतील जांभळी गल्ली, केंट गार्डनच्या तेराव्या मजल्यावरील फ्लॅटमधून बिपीन शाह याला अटक केली. बिपीन हा क्रिकेट सामन्याचे थेट प्रक्षेपण पाहून सामन्यावर बेटींग घेताना दिसून आला. त्याच्या चौकशीतून त्याचे काही सहकारी सांताक्रूझ येथून बेटींग घेत असल्याचे उघडकीस आले. त्यानंतर या पथकाने सांताक्रूझ येथील लिंक रोडवरील आशियाना इमारतीमध्ये छापा टाकून जितेंद्र जाधव, देवीलाल जाट आणि नारायणलाल रेबारी या तिघांना अटक केली. घटनास्थळाहून पोलिसांनी एक लॅपटॉप, मोबाईल कम्युनिकेटर बॉक्स, बारा नोकिया, चार सॅमसंग, एक लावा कंपनीचे मोबाईल, एक टीव्ही, मोबाईल चार्जर आणि कॅश आदी मुद्देमाल जप्त केला आहे.

# साखर कारखान्यांना प्रति टन पाचशे रुपयांची मदत करा!

## कोल्हापूर कारखानदारांचे मुख्यमंत्र्यांना साकडे

विशेष प्रतिनिधी

मुंबई, मंगळवार - ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एकरकमी एफआरपी देण्यासाठी राज्य शासनाने कारखान्यांना प्रति टन पाचशे रुपयांची मदत करावी, अशी मागणी कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून केली. राज्य साखर संघाचे अध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर यांच्या नेतृत्वाखालील साखर कारखानदारांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची मंत्रालयात मंगळवारी भेट घेतली.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सोलापूर दौऱ्यादरम्यान त्यांना विनंती करुन येत्या दोन दिवसात याप्रश्नी तोडगा काढू, असे आश्वासन दिले.

यावेळी साखर कारखानदारांनी मुख्यमंत्र्यांना मागणीचे निवेदनही दिले. या निवेदनात साखर कारखानदारीसमोरील अडचणी आणि राज्य सरकारने करायच्या उपाययोजना आदींचा समावेश आहे. ऊसाची एकरकमी एफआरपी देताना साखर कारखानदारांना पाचशे रुपये कमी पडत आहेत. ही रक्कम शासनाने अनुदान म्हणून द्यावी किंवा केंद्राकडे पाचशे रुपये वाढवून घेऊन साखर दर प्रति क्विंटल २,९०० वरून ३,४०० रुपये करण्यास भाग पाडावे, या मागणीचा आग्रह यावेळी शिष्टमंडळातील सदस्यांनी केला. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे उद्या सोलापूर दौऱ्यावर येत असून याबाबत मी त्यांना विनंती करुन यावर तातडीने येत्या दोन दिवसात तोडगा काढू, असे आश्वासन दिले. त्यानंतर साखर कारखानदारांचे हे शिष्टमंडळ मंत्री चंद्रकांत पाटील आणि कृषी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांनाही भेटले.

एकरकमी एफआरपी देण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आश्वासनानुसार राज्य सरकारने टनाला ५०० रुपयांप्रमाणे अनुदान न दिल्यास किंवा केंद्र सरकारने साखर दर २,९०० रुपयांवरून ३,४०० रुपये न केल्यास अकरा तारखेला साखर कारखानदारांची बैठक बोल-ावण्यात येणार आहे. त्यात यापुढे साखर कारखाने सुरू ठेवायचे की नाही याबाबतचा निर्णय घेणार असल्याचेही कारखानदारांनी स्पष्ट केले आहे.

शिष्टमंडळात माजी मंत्री प्रकाश आवाडे, आमदार हसन मुश्रीफ, आमदार चंद्रदीप नरके, दत्त साखर कारखान्याचे अध्यक्ष गणपतराव पाटील, शरद साखर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र पाटील-यड्रावकर, गुरुदत्त साखर कारखान्याचे अध्यक्ष माधवराव घाटगे आणि आजरा साखर कारखान्याचे अध्यक्ष अशोकराव चराटी आदी उपस्थित होते.

# दोन हजाराची लाच घेताना म्हाडा अधिकाऱ्याला अटक

मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी) - दोन हजार रुपयांची लाच घेताना म्हाडाच्या अधिकाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. राशीदअली हैदर शेख असे या आरोपीचे नाव असून तो म्हाडाचा विभागीय लेखापाल म्हणून काम करीत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

आज दुपारी म्हाडा कार्यालयात झालेल्या या कारवाईने तिथे उपस्थित कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली होती. यातील तक्रारदार बांधकाम ठेकेदार असून त्यांनी म्हाडा कार्यालयात निविदा दाखल केली होती, मात्र त्यांची निविदा म्हाडाने नामंजूर केली. त्यामुळे निविदेसाठी जमा केलेली अनामत रक्कम परत मिळावी यासाठी त्यांनी विभागीय लेखापाल कार्यालयात अर्ज केला होता.

ही रक्कम देण्यासाठी लेखापाल राशिदअली शेख यांनी त्यांच्याकडे दोन हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. ही रक्कम दिल्याशिवाय त्यांची अनामत रकमेचा धनादेश काढला जाणार नाही, अशी धमकीच त्यांनी दिली होती. लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी राशिदअलीविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागात तक्रार केली. या तक्रारीची शहानिशा केल्यानंतर या अधिकाऱ्यांनी मंगळवारी दुपारी या कार्यालयात साध्या वेशात सापळा रचला. यावेळी तक्रारदाराकडून दोन हजार रुपयांची लाच घेताना राशिदअली शेख याला या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडले.

# दहा टक्के आरक्षण न्यायालयात टिकणार नाही - प्रकाश आंबेडकर


वृत्तसंस्था

मुंबई, मंगळवार - आर्थिकदृष्ट्या मागासवर्गाला दहा टक्के आरक्षण जाहीर करून केंद्रातील मोदी सरकारने स्वत:च्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली आहे. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हा निर्णय घेतला असला तरी तो न्यायालयात टिकणार नाही, असा दावा भारिप बहुजन महासंघाचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केला.

आर्थिकदृष्ट्या मागास सवर्णांनाही दहा टक्के आरक्षण देण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर पत्रकार परिषदेत प्रकाश आंबेडकर म्हणाले की, आगामी निवडणुकांना आता केवळ ९० दिवस उरले आहेत. त्यामुळेच भाजप सरकारने दहा टक्के आरक्षणाची घोषणा केली आहे. मुळात ५० टक्के आरक्षणाची मर्यादा असताना मोदी सरकारने घेतलेला हा निर्णय सरकारची बौद्धिक दिवाळखोरी दाखविणारा आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपण संविधानाला फारसे महत्व देत नसल्याचे अनेकवेळा म्हटले आहे. तीन राज्यांच्या निवडणूक निकालानंतर चित्र पालटले आहे. निवडणुकांमध्ये फारसे यश मिळत नाही, त्यामुळे आता आरक्षणाचे कार्ड खेळण्यात आले आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हा निर्णय घेण्यात आला असला तरी त्याचा कोणताच लाभ भाजपला मिळणार नाही. उलट या निर्णयामुळे भाजपचा तोटाच होणार आहे. सध्या खुल्या प्रवर्गासाठी ५० टक्के जागा शिल्लक आहेत. त्यात पुन्हा दहा टक्के आरक्षण दिल्यास खुल्या प्रवर्गाच्या संधी आपोआप कमी होणार. विशेष म्हणजे खुल्या प्रवर्गातील लोकच भाजपचे पारंपारिक मतदार आहेत. त्यामुळे राजकीय हाराकिरी करणाराच हा निर्णय आहे, असे आंबेडकर म्हणाले.

# सर्वोच्च न्यायालयाने 'जागा' दाखवली, सीबीआय वादावर राज ठाकरे यांचे बोचरे व्यंगचित्र




# अंधेरीत तरुणीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला अटक

मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी) - मोबाईलवरुन शूट करुन तरुणीचा विनयभंग करणाऱ्या भूषण लक्ष्मण नाईक या ४० वर्षांच्या आरोपीला अंधेरी रेल्वे पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर त्याला अंधेरीतील महानगर दंडाधिकारी न्यायालयाने २२ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

भूषण नाईक हा नालासोपारा येथील मर्देश निर्मल, बंकरवाडीचा रहिवाशी असून तो बेरोजगार आहे. आज सकाळी तो अंधेरी रेल्वे स्थानकात आला होता. यावेळी बुकींग हॉलजवळ एक २६ वर्षांची तरुणी तिच्या मैत्रिणीची वाट पाहत होती. तिला पाहून त्याने मोबाईलवरुन तिचे शूटींग काढण्यास सुरुवात केली. हा प्रकार या तरुणीच्या निदर्शनास येताच तिने दुसऱ्या बाजूला जाण्याचा निर्णय घेतला, तिथे उभी राहून ती तिच्या मैत्रिणीची वाट पाहत होती. काही वेळाने भूषण तिथेही गेला. त्याने पुन्हा मोबाईलवरुन तिचे फोटो काढण्याचा प्रयत्न केला होता. या घटनेनंतर तिने त्याला जाब विचारुन तिथे उपस्थित एमएसएफचे कर्मचारी सानिका उतपुरे आणि भाविता नवगुडे यांना हा प्रकार सांगितला. त्यानंतर त्याला ताब्यात घेऊन अंधेरी रेल्वे पोलिसांच्या स्वाधीन केले.

या तरुणीच्या तक्रारीवरुन पोलिसांनी भूषणविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा नोंदविला. याच गुन्ह्यात नंतर त्याला पोलिसांनी अटक केली. सध्या तो न्यायालयीन कोठडीत असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांनी सांगितले.

# ज्येष्ठ बासरीवादक डॉ. पं. केशव गिंडे यांना जीवनगौरव पुरस्कार

मुंबई, मंगळवार (विशेष प्रतिनिधी) - भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांच्या नावे शास्त्रीय संगीतासाठी दिला जाणारा यावर्षीचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ बासरीवादक डॉ. पं. केशव गिंडे यांना गुरूवारी म्हणजेच १० जानेवारीला यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड, पुणे येथे शासनाच्यावतीने प्रदान केला जाणार आहे.

प्रतिवर्षी राज्य शासनातर्फे शास्त्रीय गायन व वादन या क्षेत्रात प्रदीर्घ काळ उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कलाकारास भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांच्या नावे शास्त्रीय संगीत क्षेत्रातील जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. या पुरस्काराचे स्वरूप पाच लाख रोख, मानपत्र, सन्मानचिन्ह असे आहे. ज्येष्ठ शास्त्रीय गायक पं. नाथ नेरलकर यांच्या हस्ते डॉ. पं. केशव गिंडे यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. यापूर्वी हा पुरस्कार किशोरी आमोणकर, पं. जसराज, प्रभा अत्रे, पं. राम नारायण, परवीन सुलताना आणि माणिक भिडे यांना प्रदान करण्यात आला आहे.

# १० टक्के आरक्षणाचा लाभ महाराष्ट्रात ९० लाख लोकांना होणार

मुंबई, मंगळवार (विशेष प्रतिनिधी) - आर्थिक निकषावर उच्चवर्णीय गरीब माणसाला १० टक्के आरक्षणाचा लाभ मिळणार असून यामुळे शहरी व ग्रामीण भागातील मिळून ९० लाख लोकांना या आरक्षणाचा फायदा मिळणार आहे. विशेषत: ग्रामीण भागातील यामध्ये ६० लाख लोकांचा समावेश असल्याची माहिती अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. या योजनेमुळे शहरांबरोबर ग्रामीण भागातील कुटुंबाना त्याचा मोठा फायदा मिळणार आहे. याचे उदाहरण देताना मुनगंटीवार म्हणाले, एखादी व्यक्ती देवळामध्ये पुजारी म्हणून असेल व भिक्षुकी करणारी असेल त्यांना याचा मोठा फायदा होणार आहे. यासाठी गरीब सामाजिक, आर्थिक प्रवर्ग तयार करावा लागणार आहे. केंद्र सरकारने याबाबत कालच आपले धोरण जाहीर केले असून निकष ठरविण्याचे बाकी आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# शिवसेनेशी युती : चर्चेत शहा यांनीच खोडा घातल्याची भाजपमध्ये भावना

विशेष प्रतिनिधी

मुंबई, मंगळवार - शिवसेनेबरोबर चर्चा सुरू होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी बोलत होतो. मात्र, लातूरमध्ये भाजप अध्यक्ष अमित शहा यांनी भाष्य केल्यानंतर गेले दोन दिवस कोणीही बोलण्याची हिंमत करीत नाही, असे स्पष्ट करून अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी भाजपमधील अस्वस्थतेला वाचा फोडली. सेना-भाजप युतीबाबत आमचा कुठलाही इगो नाही. युती होणे हे दोन्ही पक्षांच्या दृष्टीने महत्वाचे आहे, असेही मुनगंटीवार म्हणाले.

भाजपने अजूनही सेनेबरोबर युती करायची नाही असे म्हटले नाही. आमची युती करण्याची तयारी आहे मात्र, निर्णय शिवसेनेने घ्यायचा आहे. त्यांच्या निरोपाची आम्ही वाट पाहात आहोत. गरज पडली तर आम्ही त्यांना भेटण्यासाठी मातोश्रीवर जाऊ. सेना-भाजप युतीबाबत भाजपचा कोणताही इगो प्रॉब्लेम नाही, अशा शब्दात मुनगंटीवार यांनी सेना-भाजप युतीबाबत भाष्य केले.

## नवशक्ति रोजगाराच्या संधी



नोकरी शोधताय? बरेच प्रयत्न करूनही कुठेच यश मिळत नाही? नोकरीसाठी अर्ज करून-करून थकलात? नोकरी देणाऱ्या वेबसाईट्स आणि वर्तमानपत्रं वाचून वैतागलात? आता वाचा नवशक्ति रोजगार संधी. तुमच्या आवडीची नोकरी मिळवण्यास मदत करणारा मदतनीस म्हणजे नवशक्ति रोजगार संधी...

गुरुवारी वाचायला विसरू नका

# मुंबई लोकल अपघातात दोन दिवसांत १८ जणांचा मृत्यू, २० जण जखमी

वृत्तसंस्था



मुंबई, मंगळवार - मुंबई लोकल ही मुंबईची लाइफलाइन म्हटली जाते. मात्र, मुंबईत लोकलच्या अपघातांमध्ये दोन दिवसांत एकूण १८ जणांचा मृत्यू झाला आहे. ५ जानेवारीला ९ लोकांचा मृत्यू झाला. तसेच ६ जानेवारीलाही ९ जणांचा मृत्यू झाला. तर या दोन्ही दिवशी लोकलमधून पडून एकूण २० प्रवासी जखमी झाले आहेत. त्यामुळे मुंबईची लोकल ही 'डेथलाइन'च ठरताना दिसून येत आहे.

५ जानेवारीला दादर स्थानकाजवळच्या अपघातात एक, कुर्ला येथे तीन, कल्याणला एक, चर्चगेटला एक, अंधेरीत एक, बोरीवलीत एक, पालघरमध्ये एक अशा एकूण ९ प्रवाशांचा मृत्यू झाला. तर ६ जानेवारीला झालेल्या अपघातांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या ठिकाणी एक, कुर्ला येथे एक, कल्याणला दोन, वडाळा या ठिकाणी एक, वाशीला एक, मुंबई सेंट्रल येथे एक, अंधेरीत एक आणि बोरीवलीत एक अशा एकूण ९ प्रवाशांचा मृत्यू झाला. लोकलमधून जीवघेणी कसरत करत प्रवास करू नका, असे आवाहन कायमच केले जाते. आता मात्र गेल्या काही दिवसात हा प्रवास धोकादायक होतो आहे असेच दिसून येत आहे. गेल्या दोन दिवसात विविध स्थानकांवर झालेल्या अपघातांमध्ये १८ प्रवाशांचा मृत्यू झाला तर २० जण जखमी झाले आहेत. मुंबई ट्रेन अपडेट्स या ग्रुपवर ही माहिती पोस्ट करण्यात आली आहे.

TATA

TATA STEEL LIMITED
Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282 Fax No.: +91 22 6665 7724
Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

सूचना

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ आणि कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम १०(१) ला अनुसरून **याद्वारे सूचना देण्यात येते की,** प्रायव्हेट प्लेसमेंट बेसिसवर जारी केलेल्या आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या होलसेल डेब्ट मार्केट सेगमेंटवर सूचिबद्ध केलेल्या नॉन-कन्व्हर्टिल डिबेंचर्स वरील व्याज/विमोचन खालील प्रकारे देय आहे.

| अनु. क्र. | नॉन-कन्व्हर्टीबल डिबेंचर्स (एनसीडीज) | व्याज/विमोचनाची नियत तारीख | व्याज/विमोचन प्रदानासाठी रेकॉर्ड डेट |
|---|---|---|---|
| १ | एकूण रु. ५०० कोटींची २४ जानेवारी, २०१३ रोजी वाटप केलेली ९.१५% एनसीडीज (सिरिज I) (ISIN:INE081A08199) | २४ जानेवारी, २०१९ (विमोचन आणि व्याजाचे प्रदान ) | १९ जानेवारी, २०१९ |
| २ | एकूण रु. ५०० कोटींची २४ जानेवारी, २०१३ रोजी वाटप केलेली ९.१५% एनसीडीज (सिरिज II) (ISIN:INE081A08207) | २४ जानेवारी, २०१९ (व्याजाचे प्रदान ) | |

टाटा स्टील लिमिटेड
सही/-
**पार्वथीसम के.**
कंपनी सेक्रेटरी आणि
चीफ लीगल ऑफिसर (कॉर्पोरेट अॅण्ड कॉम्प्लायन्स)

७ जानेवारी, २०१९
मुंबई

TATA STEEL